**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## कुलगुरुंचे हस्ते सेवानिवृत्तीप्रसंगी सत्कार
## विद्यापीठात सेवापूर्ती / कर्तव्यपूर्ती सोहळा संपन्न

अमरावती.

कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे हस्ते परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते यांचा सेवापूर्ती व केमिकल टेक्नॉलॉजी विभागाचे प्राध्यापक डॉ.आर.एस. सपकाळ, वित्त विभागाचे वरीष्ठ सहाय्यक श्री प्रकाश शालिग्राम राजगुरे, कुलसचिव कार्यालयातील वरीष्ठ सहाय्यक श्री राजेंद्र साहेबराव देशमुख, बायोटेक्नॉलॉजी विभागातील प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री पंजाब राजारामजी ढोके व भौतिकशास्त्र विभागातील शिपाई श्री गजानन बाबाराव काळे यांचा सेवानिवृत्तीप्रसंगी शॉल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. सौ. वडते, सौ. सपकाळ, सौ. राजगुरे, सौ. देशमुख, सौ. ढोके व सौ. काळे यांचा सत्कार साडीचोळी व चांदीचा करंडा देवून परीक्षा विभागाच्या सहा. कुलसचिव सौ. मिनल मालधुरे यांनी विद्यापीठाच्यावतीने केला.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून व्य.प. सदस्य तथा विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ.एफ.सी. रघुवंशी, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, प्रभारी वि. व ले. अधिकारी श्री मंगेश वरखेडे, केमिकल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. विलास सपकाळ, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार, बायोटेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगांवकर, कर्मचारी संघाध्यक्ष श्री अजय देशमुख, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, उभयता सत्कारमूर्ती डॉ.जे.डी. वडते, सौ. वडते, डॉ.आर.एस. सपकाळ, सौ. सपकाळ, श्री प्रकाश राजगुरे, सौ. राजगुरे, श्री राजेंद्र देशमुख, सौ. देशमुख, श्री पंजाब ढोके, सौ. ढोके, श्री गजानन काळे व सौ. काळे उपस्थित होते.

सत्कारप्रसंगी मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, परीक्षा नियंत्रक म्हणून डॉ. वडते यांची कारकिर्द चांगली राहिली आहे. कामात निष्ठा, प्रामाणिकपणा व हिंमतीने त्यांनी विद्यार्थ्यांच्या हितार्थ अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतलेत. सेवानिवृत्त होत असलेल्या सर्वच कर्मचाऱ्यांनी आपल्या कामाची छाप सदैव पाडली व आपल्या संस्थेची प्रतिमा सातत्याने उंचावेल, यासाठी कार्य केले. सेवानिवृत्त माणूसरुपी कर्मचाऱ्याची होत नसतो, तर त्यांच्यातील अनुभवाची व कार्यामधील प्रतिमेची निवृत्ती होत असते. विद्यापीठाला कौशल्यपूर्ण आणि गुणवत्तेचे कर्मचारी लाभलेत. सातत्याने नवनवीन कौशल्य हस्तगत करण्याची त्याच्यामध्ये जिद्द आहे. संख्येने जरी कमी असले तरी गुणवत्तेने येथील कर्मचारी पुढे असल्यामुळे वाढत्या कामाची जबाबदारी सुद्धा ते सक्षमतेने पार पाडतात, ही विद्यापीठासाठी गौरवास्पद बाब असून विद्यापीठाच्या विकासासाठी सर्वजण कटीबद्ध असल्याचे ते म्हणाले.

प्रमुख अतिथी डॉ.एफ.सी. रघुवंशी म्हणाले, दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे. कमी मनुष्यबळ, विद्यार्थी, महाविद्यालये, विषय, अभ्यासक्रम आदींची वाढती संख्या आणि चॉईस बेस क्रेडीट सिस्टीम, सेमिस्टर पद्धती यामुळे कर्मचाऱ्यांवर असलेला कामाचा ताण सेवानिवृत्तीमुळे आणखी वाढत आहे. विद्यार्थी घडविण्यासाठी विद्यापीठाच्यारुपाने सर्वजण चांगले काम करीत असून विद्यापीठाच्या प्रगतीमध्ये सर्वांचाच महत्वपूर्ण वाटा आहे. तर प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर यांनी धडाडीचा, हिंमतबाज अधिकारी डॉ.जे.डी. वडते यांच्यासमोर परीक्षा नियंत्रक असतांना अनेक संकटे आलीत, त्याचा त्यांनी ताकदीने सामना केला. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी

परीक्षांचे संगणकीकरण करण्यासाठी पुढाकार घेतल्याचेही ते म्हणाले.

सत्कारमूर्ती डॉ.जे.डी. वडते मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, परीक्षा संचालक म्हणून मला पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करता आला. काम करतांना दडपण होते; पण पूर्ण जबाबदारीपूर्ण काम करुन अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले, त्याकरिता कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर सरांचे मार्गदर्शन बहुमूल्य ठरले. केमिकल टेक्नॉलॉजी विभागामध्ये विद्यार्थ्यांसाठी अहोरात्र काम केल्याचे समाधान होत असल्याचे डॉ.आर.एस. सपकाळ यांनी, तर श्री प्रकाश राजगुरे यांनी अंकेक्षण विभागाच्या माध्यमातून चांगली सेवा देण्याचे भाग्य लाभल्याचे सांगून याप्रसंगी देहदानाचा संकल्प व्यक्त केला. याशिवाय श्री राजेंद्र देशमुख, श्री पंजाब ढोके व श्री गजानन काळे यांनीसुद्धा आपले मनोगत व्यक्त केले.

विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी प्रास्ताविक भाषण करुन पाहुण्यांचे शब्दसुमनाने स्वागत केले व सत्कारमूर्तींना रजा रोखीकरणाचा धनादेश प्रदान केला. याप्रसंगी नियंत्रण अधिकारी डॉ. विलास सपकाळ, डॉ.एस.के. ओमनवार, डॉ. प्रसाद वाडेगांवकर, श्री मंगेश वरखेडे यांनी, तर कर्मचारी संघाध्यक्ष श्री अजय देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री दिपक काळे यांनी पतसंस्थेतर्फे उभयतांचा सत्कार करुन कल्याण निधी व भागभांडवल राशीचा धनादेश प्रदान केला. संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाला माजी प्र-कुलगुरु डॉ. जयकिरण तिडके, व्य.प. सदस्य डॉ.डी.डब्ल्यू. निचत, आय.आय.एल. चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.सौ. मनिषा काळे, माजी कुलसचिव डॉ. दिनेशकुमार जोशी, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. मोहन खेरडे, एल.एल.एल. चे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे तसेच विद्यापीठाचे विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी व सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सोबत** :- कार्यक्रमाचे स्वतंत्र फोटो पाठवित आहे.

१) मा.कुलगुरु डॉ.जे.डी. वडते यांचा सत्कार करतांना, २) मा.कुलगुरु डॉ.आर.एस. सपकाळ यांचा सत्कार करतांना, ३) मा.कुलगुरु श्री प्रकाश राजगुरे यांचा सत्कार करतांना, ४) मा.कुलगुरु श्री राजेंद्र देशमुख यांचा सत्कार करतांना, ५) मा.कुलगुरु श्री पंजाब ढोके यांचा सत्कार करतांना, ६) मा.कुलगुरु श्री गजानन काळे यांचा सत्कार करतांना.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

दि. ०३/०७/२०१८.

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी